MHKO120001812025

# नियमीत दिवाणी दावा क्र.४६/२०२५ मधील

## नि. ७७ वरील आदेश

(धोंडीराम वि. तानाजी)

प्रस्तुतचा अर्ज वादीने, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ व कलम १५१ प्रमाणे प्रतिवादी क्र. २अ चे नावाची दुरुस्ती दावेत व तुर्तातुर्त मनाई अर्जात करणेकरिता केला आहे.

२. प्रस्तुतचा दावा वादीने हक्कज्ञापन व कायम मनाई मिळण्यासाठी केला आहे.

३. वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रतिवादी २अ यांचे नाव नजरचुकीने व टंकलेखनाच्या दोषामुळे 'श्रीमती शालुबाई दिनकर पाटील' असे नमूद झाले आहे. प्रत्यक्षात त्यांचे नाव 'श्रीमती शांताबाई दिनकर पाटील' असे आहे. सदरचा दावा चौकशी करिता असल्याने वादीने सरतपास पुरावा दाखल केलेला नाही. सदरची बाब ही टंकलेखनाच्या चुकीमुळे झालेमुळे प्रतिवादी क्र. २अ यांचे योग्य नाव न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. सदरची दुरुस्ती नामंजूर झालेस वादींचे कशानेही न भरुन निघणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, सदरचा दुरुस्ती अर्ज मंजूर करणेत यावा, अशी विनंती वादीने केली आहे.

४. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादीने म्हणणे दिले आहे. प्रतिवादीने असे म्हणणे दिले की, सदर प्रकरणाचा रोजनामा पाहिला असता वादीला सदर प्रतिवादी बाबत तजवीज करणेची सुचना खूप पूर्वीच दिली आहे, तरीही वादींनी ती केलेली नाही. त्यामुळे विलंबाने दिलेला अर्ज नामंजूर करणेत यावा. वादीस दावेत दुरुस्ती मागता येईल, परंतु, नि. ५ चे अर्जात कायद्याने मागता येणार नाही. त्यामुळे, सदरचा अर्ज नामंजूर करावा, अशी विनंती केली आहे.

५. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतच्या दाव्यामध्ये अद्याप मुद्दे काढलेले नाहीत त्यामुळे दि. प्र. सं. आदेश ६ नियम १७ चे परंतूक (due diligence proviso) लागु होत नाही. अशा वेळेस उदारमतवादी (liberal approach) घेणे जरुरीचे आहे. तसेच नियम

हे न्याय साध्य करण्यासाठी आहेत. (Rules are made handmaid of justice) या संकल्पनेचा विचार करणे आवश्यक आहे.

६.            वादी यांचा प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटत असलेने दि. प्र. सं. कलम १५१ चा आधार घेत व दि. प्र. सं. आदेश ६ नियम १ च्या तत्वानुसार 'कथने' (Pleadings) मध्ये केवळ दावा अथवा कैफियत यांचा अंतर्भाव होतो व दि. प्र. सं. आदेश ६ नियम १७ नुसार केवळ कथनामध्ये दुरुस्ती करता येवू शकते व अर्जामध्ये (नि. ५ चा अर्ज) करता येणार नाही. त्यामुळे अर्ज अंशतः मंजूर करणे जरुरीचे वाटत आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करतो.

| **आदेश** | |
|---|---|
| १. | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| २. | वादीला नि. ७७ मध्ये मागणी केलेप्रमाणे दावा दुरुस्ती करणेकरिता परवानगी देण्यात येत आहे. वादीने मंजुर केलेली दावा दुरुस्ती आजपासून १४ दिवसांत करणेची आहे, तसेच दावा दुरुस्ती प्रत प्रतिवादीला १४ दिवसांत देणेची आहे. |
| **(खुल्या न्यायालयात जाहीर )** | |

NISHANT DIPAK RUDRABHATE

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2025.10.01 10:47:17 +0530

**गारगोटी.**                **(नि. दि. रुद्रभटे)**

दिनांक– ३०/०९/२०२५                दिवाणी न्यायाधीश क.स्तर

गारगोटी